## विशेष दिवाणी मुकदमा क्र.८/२०१७ मधील निशाणी क्र.९३ वरील आदेश

प्रस्तूतचा अर्ज प्रतिवादी क्र.४ याने त्याचेविरुद्ध पारीत झालेला 'विना कैफियत' चा आदेश रद्द होवून मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. अर्ज व त्यावरील निशाणी क्र.९७ कडे वादींनी दाखल केलेले म्हणणे वाचले. वादींतर्फे व प्रतिवादींतर्फे युक्तीवाद ऐकला.

३. प्रतिवादी क्र.४ याने असे कथन केले की, तो उद्योगधंद्यानिमित्त परगावी असल्याने तसेच आवश्यक माहिती व कागदपत्रे वेळेत न मिळाल्याने त्याला मुदतीत कैफियत दाखल करणे शक्य झाले नाही. त्याने जाणूनबुजून कैफियत देण्यास टाळाटाळ केलेली नाही. म्हणून त्यांनी 'विना कैफियत' चा आदेश रद्द होवून मिळण्याची विनंती केली.

४. वादींनी प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करुन हरकत घेतली. वादींनी असे कथन केले की, प्रतिवादी क्र.४ याला दिनांक २१/०३/२०१७ रोजी दाव्याचे समन्सची बजावणी झालेली असून ते वकीलांमार्फत दिनांक ०३/०४/२०१७ रोजी हजर झाले आहेत. म्हणजेच दाव्याचे समन्स मिळल्यापासून प्रस्तुतचा अर्ज दाखल करेपर्यंत प्रतिवादी क्र. ४ याला १४४९ दिवसाची म्हणजे सुमारे ४ वर्षांची संधी मिळालेली आहे. प्रतिवादी व त्याचे वकीलांना दाव्याची माहिती असुन देखील जाणीवपुर्वक कैफियत दाखल केलेली नाही. दाव्याचे समन्सची बजावणी झालेनंतर ३० दिवसांच्या आत प्रतिवादीने उत्तर दिले पाहिजे हे प्रतिवादीला माहित असून तसेच दाव्याची कागदपत्रे उपलब्ध असून देखील प्रतिवादी क्र.४ ने वेळेत कैफियत दाखल केलेली नाही. प्रतिवादीने सुमारे ४ वर्षांनंतर प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. प्रतिवादींना दावा मिळकतीच्या व्यवहाराची संपूर्ण मोबदला रक्कम देण्यात

आलेली आहे. वादीने दावा मिळकत खरेदी करणेकामी जनता सहकारी बँकेचे कर्ज काढले होते. सदर रकमेवरील व्याज कोरोना महामारीच्या कालावधीत भरता न आल्याने वादीची बँकेची जप्तीची नोटीस आलेली आहे. प्रतिवादीच्या बेकायदेशीर वागण्यामुळे वादीला आर्थिक नुकसान व मानसिक त्रास होत आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

५. त्यांनी अर्ज व त्यामधील म्हणणे यांचे अनुषंगाने युक्तीवाद केला. प्रस्तूत प्रकरणाचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र. ४ विरुध्द दिनांक २७.०६.२०१७ रोजी विना कैफीयत आदेश झाला असून दिनांक २६.०२.२०२१ रोजी प्रस्तूतचा अर्ज दाखल केलेला आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ८ नियम १ अन्वये ९० दिवसाच्या आत कैफीयत दाखल करणे आवश्यक आहे परंतू कैफीयत ९० दिवसाच्या आत दाखल न केल्यास प्रतिवादीचे म्हणणे /कैफीयत दाखल करण्याची परवानगी देता येते. प्रस्तूतचा विचाराधीन अर्ज दिनांक २६.०२.२०२१ रोजी दाखल केलेला आहे. दावा विना कैफीयत चौकशीसाठी प्रलंबीत होता. वादी क्र. २ तर्फे निशाणी क्र. ६६ कडे पुराव्याचे शपथपत्र देखील दाखल केलेले आहे परंतू अद्याप त्याचा उलटतपास झालेला नाही. अशावेळी प्रतिवादी क्र. ४ याला कैफीयत देण्याची संधी दिल्यास वादीचे कसलेही नुकसान होणार नाही. या उलट अर्ज नामंजूर केल्यास प्रतिवादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. झालेल्या विलंबाबाबत वादीस प्रतिवादी क्र. ४ कडून योग्य तो खर्च देणे आवश्यक आहे. म्हणून मी पुढील आदेश पारित करतो.

## आ दे श

१. निशाणी क्र. ९३ कडील अर्ज ३,०००/– रुपये (तीन हजार रुपये फक्त) खर्चावर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. ४ विरुध्द पारित केलेला विना कैफीयत आदेश रद्द करण्यात येतो.

३. प्रतिवादी क्र.४ ने खर्चाची रक्कम पुढील तारखेपर्यंत वादींना द्यावी अन्यथा सदरहू आदेश रद्द समजण्यात येईल्.

ठिकाण – वडूज
दिनांक – १७.०९.२०२१

(के. सी. माने)
दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, वडूज